**नि.फौ.ख.क्र. ३९२/२०१२**
शासन वि. अमोल लवटे
नि.क्र. ९३

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.०४**

मी शपथेवर खरे कथन करतो की,

नाव : भीमराव बापु काळे,
वय : ७० वर्षे, व्यवसाय: शेती,
रा. नांदगांव, ता.कराड, जि. सातारा.

**सरतपासणी –सरकारी वकील श्रीमती एन.एस.अहिवळे, यांचे मार्फत**

१. खबर देणार ही माझी मुलगी आहे. आरोपी क्र. १ ते ३ यांना मी ओळखतो. आरोपी क्र. १ हा माझा जावई असुन आरोपी क्र.२त्याची आई आहे. आरोपी क्र.३ ही आरोपी क्र. १ याची दुसरी पत्नी आहे. आरोपी क्र. १ व २ आज न्यायालयात हजर आहेत. सन २०१० मध्ये खबर देणार हिचा विवाह आरोपी क्र.१ याच्याशी पाचवड येथे मंगल कार्यालयात झाला होता. त्यावेळी मी खबर देणार हिला एक तोळा सोने घातले होते व संसारोपयोगी साहित्य दिले होते. विवाहानंतर १५ दिवस ते ३ आठवड्यांच्या कालावधीमध्ये आरोपींनी खबर देणार हिला त्रास देण्यास सुरुवात केली. आरोपींनी तिच्याकडे गायी घेण्यासाठी र.रु.५०,०००/– ची मागणी केली होती. आरोपी तिच्याशी भांडण काढुन तिला उपाशी ठेवत होते. मी आरोपींना समजावुन सांगितले होते. आरोपींनी त्रास देण्याची बंद केले नाही. त्यानंतर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस. बी. शिंदे यांच्या तर्फे शपथेवर सुरु**

२. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस ठाण्यात खबर दिल्यानंतर आरोपी क्र. १ हा खबर देणार हिच्यासोबत नांदगाव येथे येवुन–जावुन राहत होता. हे म्हणणे खरे आहे की, खबर दिल्यानंतर खबर देणार हिला आरोपी क्र. १ पासुन ३ अपत्ये झाली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ याची आर्थिक परिस्थीती चांगली आहे. हे म्हणणे खरे नाही की, खबर देणार ही हट्टी स्वभावाची आहे. हे म्हणणे खरे नाही की, खबर देणार ही आरोपी क्र. १ याच्याकडे विभक्त राहणेकरिता हट्ट धरीत होती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझा जबाब लिहीला आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी त्यामध्ये काय लिहीले आहे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, खबर देणार ही स्वेच्छेने माहेरी

राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, खबर देणार हिच्या सांगणेवरुन साक्ष देणेकरिता आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामध्ये नमुद संपुर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली आहे.

**उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2026.08.01 17:49:35 +0530

दि. ०१/०८/२०२६. (ए.ए. उत्पात)

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कराड.

**(कोर्ट क्र.०४)**

**नि.फौ.ख.क्र. ३९२/२०१२**
शासन वि. अमोल लवटे
<u>नि.क्र. ९२</u>

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.०३</u>**

मी शपथेवर खरे कथन करतो की,

नाव : अरुण रामचंद्र पाटील,
वय : ५६ वर्षे, व्यवसाय: शेती,
रा. नांदगांव, ता.कराड, जि. सातारा.

**<u>सरतपासणी –सरकारी वकील श्रीमती एन.एस.अहिवळे, यांचे मार्फत</u>**

१. खबर देणार हिला मी ओळखतो. ती सद्या नांदगाव येथे माझ्या घराशेजारी राहते. तिचा विवाह सन २०१० मध्ये आरोपी क्र. १ याच्याशी पाचवड येथे मंगल कार्यालयात झाला आहे. त्यावेळी खबर देणार हिला एक तोळा सोने घातले होते व संसारोपयोगी साहित्य दिले होते. ती नांदगाव येथे आली असता मी तिला विचारणा केली होती तेव्हा तिने मला सांगितले होते की, आरोपी तिला त्रास देत होते. आरोपी तिच्याकडे गायी घेण्यासाठी र.रु.५०,०००/– ची मागणी करुन तिला उपाशी ठेवुन मारहाण करीत असलेचे सांगितले होते. त्यानंतर दोघांमध्ये तडजोड झाली होती. त्यानंतर खबर देणार ही आरोपींकडे नांदावयास गेली असता पुन्हा तोच प्रकार झाला. आरोपींनी खबर देणार हिला तिच्या मुलीसह रात्री ८.०० वाजणेच्या सुमारास घरातुन बाहेर काढले तेव्हा ती नांदगाव येथे आली होती.
**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस. बी. शिंदे यांच्या तर्फे शपथेवर सुरु</u>**

२. आता मला पोलीस जबाब वाचुन दाखविला. हे म्हणणे खरे नाही की, खबर देणार हिचा स्वभावा रागीट व चिडचिडा आहे. आरोपींनी कथीत रकमेची मागणी माझ्यासमक्ष केली नव्हती. मी खबर देणार हिच्या सासरी आरोपींच्या घरी कधीही गेलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आरोपींच्या घरची परिस्थिती व घटना याबाबत मला व्यक्तीशः माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथित घटनेबाबत मला व्यक्तीशः माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, केवळ खबर देणार

हिच्या सांगणेवरुन मी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासामध्ये कथन केलेला संपुर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली आहे.

**उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2026.08.01 17:49:45 +0530

दि. ०१/०८/२०२६.

(ए.ए. उत्पात)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कराड.
**(कोर्ट क्र.०४)**

**नि.फौ.ख.क्र. ३९२/२०१२**
शासन वि. अमोल लवटे
नि.क्र. ९०

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.०२**

मी शपथेवर खरे कथन करतो की,

नाव : भाग्यश्री अमोल लवटे,
वय : ३४ वर्षे, व्यवसाय: गृहिणी,
सध्या रा. नांदगांव, ता.कराड, जि. सातारा.

**सरतपासणी –सरकारी वकील श्रीमती एन.एस.अहिवळे, यांचे मार्फत**

१. माझे लग्न आरोपी क्र. १ याच्याशी दि. २१/०३/२०१० रोजी पाचवड फाटा येथील मंगल कार्यालयात झाले आहे. सदर लग्नाच्यावेळी माझ्या आई वडिलांनी एक तोळे सोने व संसारोपयोगी साहित्य दिले होते. मी लग्नानतर आरोपी क्र. १ याच्या घरी नांदावयास गेले. त्यानंतर सन २०१२ कालावधीमध्ये माझ्या कुटुंबामध्ये माझी सासुबाई जगुताई चंद्रकांत लवटे व माझे पती अमोल चंद्रकांत लवटे, मुलगी स्वरुपा अमोल लवटे अशी एकत्र राहत होतो. लग्नानंतर १५ दिवसांच्या कालावधीमध्ये माझा मानसिक व शारीरिक छळ सुरु केला. मला घरातील काम जमत नाही म्हणुन तसेच गायी खरेदी करणेसाठी र.रु. ५०,०००/– माहेराहुन घेवुन येण्याची मागणी केली. तसेच मला उपाशीपोटी बसवत होते व घरातुन बाहेर काढत होते. त्याबाबत मी माझ्या आई वडिलांना सांगितले होते. माझ्या आई वडिलांनी त्यांना समजावुन सांगणेचा प्रयत्न केला. त्यानंतर आरोपींनी ऐकले नाही व पुन्हा मला मानसिक व शारीरिक त्रास देणेस सुरुवात केली. त्यानंतर कराड शहर पोलीस ठाणे येथे तक्रार दिली. आता मला सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी दि.१४/०९/२०१२ रोजीचा खबरी जबाब दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.९१** देणेत येतो. सदर खबर मी माझे पती अमोल चंद्रकांत लवटे, सासुबाई जगुताई चंद्रकांत लवटे व लता रामचंद्र खुस्पे यांच्याविरुध्द दिली होती. त्यानंतर पोलीसांनी माझा पुरवणी जबाब नोंदविला. दरम्यान तडजोड झाल्यामुळे मी पुन्हा सासरी गेले होते. दि.११/०८/२०१२ रोजी अमोल चंद्रकांत लवटे याने लता रामचंद्र खुस्पे हिच्याशी दुसरे लग्न केले होते. लता रामचंद्र खुस्पे हे त्या महिलेचे माहेरचे नाव असुन लता अमोल लवटे हे तिचे सासरचे नाव आहे. त्यावेळी

आरोपी क्र. ३ लता ही मला आरोपी क्र. १ अमोल याच्याशी बोलु देत नव्हती तसेच मला मारहाण करुन माझा शारीरिक छळ करीत होती. मी आरोपींना पाहिल्यास ओळखु शकते. आरोपी क्र. १ व २ आज न्यायालयात हजर आहेत. आरोपी क्र. ३ न्यायालयात हजर नाही.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस. बी. शिंदे यांच्या तर्फे शपथेवर सुरु</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती आरोपी क्र. १ हे त्यांच्या घरातील एकमेव कर्ते पुरुष आहेत.हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ याच्या घरची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. आता मला पोलीस जबाब वाचुन दाखविला. हे म्हणणे खरे आहे की, मी खबर दिली त्यावेळी मला स्वरुपा नावाची मुलगी होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मला वेदिका, गणेश व लावण्या नावाची अपत्ये झाली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणी खबर दिल्यानंतर आरोपी क्र. १ याचे माझ्याकडे येणेजाणे होते. हे म्हणणे खरे आहे की, वेदिका, गणेश व लावण्या ही मला आरोपी क्र.१ याच्यापासुन झालेली अपत्ये आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सासुबाई आरोपी क्र. २ यांच्याशी माझे पटत नसलेमुळे मी माझे पती आरोपी क्र. १ यांच्याकडे विभक्त राहणेबाबत हट्ट केला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ याने मला तो त्याच्या आईचा एकमेव मुलगा असल्यामुळे विभक्त राहु शकत नसल्याचे सांगितलेनंतर मी घरामध्ये चिडचिड करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, तरीदेखील सुमारे ५ ते ७ महिन्याच्या कालावधीकरिता मी आरोपी क्र. १ सह मौजे मुंढे या गावी विभक्त राहिली होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या कालावधीमध्ये देखील मी आरोपी क्र. १ याच्याशी भांडण करुन माहेरी जात होते. हे म्हणणे खरे नाही की, माझा स्वभाव रागीट आहे. हे म्हणणे खरे आहे की, खबरमधील संपुर्ण मजकूर पोलीसांनी लिहीला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणी खबर दाखल केल्यानंतर मला आरोपी क्र. १ याच्यापासुन वेदिका, गणेश व लावण्या अपत्ये झाली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गणेश याचे वय सद्या ६ वर्षे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२० पर्यंत मी आरोपी क्र. १ याच्यासोबत एकत्र राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लग्नाचा खर्च आरोपी क्र. १ याने केला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ याने कथित आरोपी क्र. ३ हिच्याशी विवाह केलेबाबत माझ्याकडे पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सुरुवातीपासुन माझ्या आईचे ऐकत आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईच्या सांगणेवरुन मी आरोपींशी वाद करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, लग्नानंतर १५ दिवसांच्या कालावधीमध्ये माझा मानसिक व शारीरिक छळ सुरु केला, मला घरातील काम

जमत नाही म्हणुन तसेच गायी खरेदी करणेसाठी र.रु. ५०,०००/- माहेराहुन घेवुन येण्याची मागणी केली, तसेच मला  उपाशीपोटी बसवत होते व घरातुन बाहेर काढत होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला कथित क्रुर वागणुक दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी रागीट स्वभावाची असल्यामुळे स्वतः माहेरी निघुन गेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी खबर दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, विवादित खबर दिल्यानंतर झालेल्या तडजोडीप्रमाणे मी आरोपीकडे नांदावयास गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर देखील मी आरोपींशी भांडण करुन परत माहेरी गेले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कथित पैशाची मागणी करुन उपाशी ठेवल्याचे व शारीरिक तसेच मानसिक त्रास दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास नाही.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2026.08.01 17:49:51 +0530

दि. ०१/०८/२०२६.

(ए.ए. उत्पात)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कराड.
(कोर्ट क्र.०४)